# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १६/०५/२०१८

## हवेली पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस हवालदारास दोन हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांच्या मोटार सायकलचा सुमारे एक महिन्यापुर्वी स्लिप होवून अपघात झाला होता. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांची मोटार सायकल हॉटेल कोहीनूर येथे लावून गेले होते. काल दिनांक १५/०५/२०१८ रोजी तक्रारदार यांनी हॉटेलवरून त्यांची मोटार सायकल घेवून गेले त्यावेळी हॉटेल कोहीनूर येथून तक्रारदार यांना पोलीस स्टेशनला पोलीस हवालदार यांचा नंबर देवून संपर्क करण्यास सांगितले होते. त्यावरून तक्रारदार यांनी पोलीस हवालदार राऊत यांचेशी संपर्क केला असता लोकसेवक राऊत यांनी तक्रारदार यांना तुमची गाडी व कागदपत्रे पोलीस स्टेशनला घेवून या त्याबाबत तुमच्यावर गुन्हा दाखल करायचा आहे, गुन्हा दाखल करायचा नसेल तर २,०००/- रूपये द्यावे लागतील असे सांगितल्यावरून तक्रारदार यांनी लोकसेवक राऊत पोलीस हवालदार यांनी २,०००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक १६/०५/२०१८ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक राऊत पोलीस हवालदार, हवेली पोलीस स्टेशन याने तक्रारदार यांच्यावर अपघाताचा गुन्हा दाखल न करण्यासाठी २,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक मल्हारी दामू राऊत, वय ५१ वर्षे, पोलीस हवालदार ब.नं. १२३८, नेमणुक हवेली पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण याने तक्रारदार यांचेकडून २,०००/- रूपयांची लाच हॉटेल बालाजी वडेवाले, खडकवासला येथे स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर हवेली पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

(जगदीश सातव)
सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे